MHGA040003892025

दाखल तारीख : १८.०७.२०२५
नोंदणी तारीख : १८.०७.२०२५
निकाल तारीख : ११.०६.२०२६
कालावधी : ००वर्ष, १०म.,२३दि.

**नि.क्र.२५**

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)**<br>**(न्यायनिर्णयाची तारीख :११/०६/२०२६)**<br>**नि.फौ.मा.क्र.५२/२०२५** |
| | अपराध क्र. :१६९/२०२४<br>पोलीस स्टेशन : आरमोरी |
| **तक्रारदार** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **अधिवक्ता** | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. उईके |
| **आरोपी क्र.१**<br><br>**आरोपी क्र.२**<br><br>**आरोपी क्र.३** | **लिलाधर दिवाकर अनोले,**<br>वय ३३ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>**दिवाकर हरी अनोले,**<br>वय ६० वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>**विनोद प्रभाकर अनोले,**<br>वय ४१ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>सर्व राह. वाघाडा (जुना), ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **अधिवक्ता** | आरोपीचे विधिज्ञ श्री ढोंगे |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | १३.०५.२०२५ |
| प्रथम खबरेची तारीख | १४.०५.२०२५ |
| आरोपपत्राची तारीख | १८.०७.२०२५ |
| दोषारोप तयार करण्याची तारीख | ०२.०१.२०२६ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | १३.०२.२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | काही नाही. |
| निकालाची तारीख | १०.०६.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | काही नाही. |

## <u>आरोपींचा तपशिल</u>

| क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटण्याची तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४६८ भा.ना.सु.सं. च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | लिलाधर दिवाकर अनोले<br>दिवाकर हरी अनोले<br>विनोद प्रभाकर अनोले | कलम ३५(३)भा.न्या.सु. सं. सुचनापत्र दिले. | | ११८(१), ३५१(२), ३५२ सहकलम ३(५) भा.न्या.सं. | निर्दोष | नाही | काही नाही |

.............................................................................................

## <u>न्या य नि र्ण य</u>
## (<u>दिनांक १० जुन, २०२६ रोजी घोषित</u>)

आरोपींवर भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ३५१(२), ३५२ सहकलम ३(५) अन्वये दंडनिय अपराधांकरीता दोषारोप ठेवण्यात आले आहे.

**<u>अभियोग पक्षाचे कथन</u>** :-

२. दि.१३.०५.२०२५ रोजी सायंकाळी ७.३० वाजताचे आसपास फिर्यादी प्रफुल ढोरे हा विलास प्रधान याचे किराणा दुकाना जवळ बसुन असतांना आरोपी क्र.१ हा फिर्यादीला पाहुन हात दाखवुन शिवीगाळ करीत होता. फिर्यादीने त्याला विचारले की, ‘तु शिवीगाळ का करतोस'. आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादीच्या तोंडावर हाताने मारले व खाली पडले. त्यानंतर रस्त्याच्या कडेला असलेल्या काठीने आरोपींनी फिर्यादीचे डाव्या हातला व डाव्या खांद्याला मारहान केली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशन, आरमोरी येथे आरोपी विरुध्द तक्रार दिली. सदर फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द अपराध क्र.१६९/२०२४, कलम ११८(१), ३५१(२), ३५२ सहकलम ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर प्रकरणाचा तपास महिला पो.हवा. कुंदा प्रधान यांच्याकडे देण्यात आला. तपासी अंमलदार यांनी साक्षीदारांची बयाणे नोंदविली, घटनास्थळ पंचनामा केला व आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

३. या न्यायालयाने आरोपी विरुध्द नि.क्र.१४ वर भा.न्या.सं.चे कलम ११८(१), ३५१(२), ३५२ सहकलम ३(५) अन्वये दोषारोप ठेवले. दोषारोपातील आरोप आरोपींना वाचुन व समजावुन सांगण्यात आले. आरोपींनी गुन्हा कबूल नाही असे नि.क्र.१५ ते १७ वर सांगितले आणि संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. आरोपींविरुध्दचा आरोप सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादीला तपासले. त्यानंतर आरोपींविरुध्द काहीही न आल्याने त्यांचे कलम ३५१(१)(ब) भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे बयाण नोंदविण्यात आले नाही.

४. वरील विवेचनावरुन खोलील मुद्दे माझे समोर उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणानुसार त्यांचे समोर नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे कायं दि.१३.०५.२०२५ रोजी १९.३० ते २०.०० वाजताचे दरम्यान मौजा वघाडा (जुना), ता. आरमोरी येथे आरोपींनी आपसी संगनमत करुन फिर्यादी प्रफुल अंबालदास ढोरे याचे डावा हात आणि डाव्या खांद्यावर काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचविली, त्याद्वारे आरोपींनी कलम **११८(१) सहकलम ३(५)** भा.न्या.सं. अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे कायं वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमत करुन फिर्यादी प्रफुल अंबालदास ढोरे याला जिवे मारण्याची धमकी दिली, त्याद्वारे आरोपींनी कलम **३५१(२) सहकलम ३(५)** भा.न्या.सं. अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे कायं वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमत करुन फिर्यादी प्रफुल अंबालदास ढोरे याला सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ करुन उद्देशपुर्वक अपमान केला त्यायोगे फिर्यादीला प्रक्षोभित केले आणि प्रक्षोभनामुळे फिर्यादी हिचे कडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडवा असा त्यामागे उद्देश होता किंवा तसे होण्याचा संभव असल्याची जाणीव होती, त्याद्वारे आरोपींनी कलम **३५२ सहकलम ३(५)** भा.न्या.सं. अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| ४. | आदेश काय ? | आरोपींस दोषमुक्त करण्यात येते. |

## कारणे-मिमांसा

## फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष :-**

| सा. क्र. | नाव | नि.क्र. | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १. | प्रफुल अंमलदास ढोरे | २१ | फिर्यादी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**क. न्यायालयाकडुन साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील दस्तऐवजांची यादी

**अ. फिर्यादी :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.२२/सा.क्र.१ | फिर्याद |
| २ | नि.क्र.२३/सा.क्र.१ | प्रथम खबरी अहवाल |

**ब. बचाव :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड. भौतीक वस्तु :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | वस्तु क्र.A आणि B | मोठी आणि छोटी काठी |

.........................................................................................................................

## मुद्दा क्र.१ ते ४ :-

५. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द कथन सिद्ध करण्यासाठी फिर्यादी प्रफुल ढोरे (सा.क्र.१) याला तपासले. त्याने त्याच्या साक्ष पुराव्यात सांगितले की, घटना

दि.१३.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता विलास प्रधान याच्या किराणा दुकाना जवळ घडली होती. त्यावेळी तो विलास प्रधान याच्या किराणा दुकाना जवळ बसलेला होता. आरोपी क्र.१ हा फिर्यादीकडे पाहुन शिवीगाळ करत होता. तो आरोपी जवळ गेला आणि कशाला शिव्या देतो असे म्हटले तेव्हा आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादीच्या तोंडावर थापडा मारल्या, तो खाली पडला तेव्हा रस्त्याच्या बाजुला असलेल्या काठीने आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादीला मारहाण केली. फिर्यादीच्या डाव्या हाताला आणि खांद्याला त्यांनी मारल्यामुळे मार लागला. फिर्यादी त्याच्या घरी गेला, तेव्हा आरोपी क्र.१ व २ हातात काठ्या घेऊन फिर्यादीच्या घरी आले आणि त्याला जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पोलीस स्टेशन मध्ये जाऊन फिर्यादीने रिपोर्ट (नि.क्र.२२) दिला. त्यावरुन प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.२३) तयार करण्यात आला. आरोपीने ज्या काठ्यांनी मारले त्या फिर्यादीने ओळखल्या. (न्यायालयाने विचारल्यावर साक्षीदार सांगतो की, मोठ्या काठीने दिवाकरने मारले आणि छोट्या काठीने लिलाधरने मारले.) त्याला आर्टिकल 'A' आणि 'B' देण्यात आले. पोलीसांनी फिर्यादीला आरमोरी येथील सरकारी दवाखान्यात पाठविले होते व तेथे डॉक्टरांनी तपासणी करुन उपचार केले.

६. आरोपीच्या वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात आले की, फिर्यादी आणि आरोपींचे पटत नसल्यामुळे रागाच्या भरात फिर्यादीने आरोपींविरुध्द रिपोर्ट दिला होता. तसेच सरतपासणीत सांगितलेल्या घटनेशी आरोपींचा संबंध नसल्याचे त्याने कबुल केले व त्याला आरोपींनी मारल्याची घटना घडली नसल्याचे सुध्दा त्याने कबुल केले. पुढे त्याने कबुल केले की, तो गाडीवरुन पडल्यामुळे त्याच्या हाताला मार लागला.

७. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता फिर्यादी प्रफुल ढोरे (सा.क्र.१) याला आरोपींनी काठीने डावा हात व डाव्या खांद्यावर मारहाण करुन जखमी केले याबाबत काहीही सांगितले नाही. फिर्यादी हा जखमी साक्षीदार आहे व त्याने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरुन आरोपींनी सदर गुन्हा केला हे अभियोग पक्ष संशयापलीकडे सिद्ध करु शकले नाही. त्यामुळे संशयाचा फायदा

आरोपींना देण्यात येतो. म्हणुन मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते व मुद्दा क्र.४ चे अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र.१ नामे **लिलाधर दिवाकर अनोले,** आरोपी क्र.२ नामे **दिवाकर हरी अनोले,** आरोपी क्र.३ नामे **विनोद प्रभाकर अनोले** यांना भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१), ३५१(२), ३५२ सहकलम ३(५) अन्वये दंडनीय अपराधांच्या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. जप्त दोन काठ्या मुल्यहिन असल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ठ करण्यात याव्या.

३. आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र आणि जामिन बंधपत्र रद्द करण्यात येते.

४. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) अन्वये प्रत्येकी रु.१५,०००/- प्रमाणे वैयक्तीक व जात मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.06.10 16:50:52 +0530

स्थळ : आरमोरी
दि.१०.०६.२०२६

(श्रीमती व्ही. व्ही. चौधरी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आरमोरी